**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२५/०८/२०२६

**पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणे संदर्भात मा.महापौर महोदयांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकारी व मूर्तीकार यांचेसोबत प्रशासनाची बैठक संपन्न**

आगामी गणेशोत्सव-२०२६ च्या पूर्वतयारी व नियोजनाबाबत तसेच वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेच्या अनुषंगाने दि.२५ ऑगस्ट २०२६ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने मा.महापौर श्री.अजीव पाटील महोदयांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्यालयात सन्माननीय लोकप्रतिनिधी, विविध प्रशासकीय विभाग, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी व मूर्तिकार यांचेसोबत महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

या बैठकीच्या सुरुवातीस मा.उप-आयुक्त श्रीम.हर्षला राणे यांनी मागील वर्षीच्या म्हणजेच गणेशोत्सव-२०२५ च्या यशस्वी आयोजनाची माहिती थोडक्यात माहिती दिली मागील वर्षी महानगरपालिकेने कृत्रिम तलाव, फिरते हौद, जेट्टी व बंद दगडखाणीत विसर्जनाची व्यवस्था केली होती. मागील वर्षी एकूण झालेल्या ३२८७७ मूर्ती विसर्जनापैकी २५९४० म्हणजेच ७९% विसर्जन हे महानगरपालिकेच्या कृत्रिम तलाव व फिरत्या हौदांमध्ये झाले होते. यावर्षीही महानगरपालिकेमार्फत मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार करण्यात येणार असून, फिरते हौद, जेट्टी व बंद दगडखाणीतही विसर्जनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. विसर्जनाच्या ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र, आरती स्थळे, निर्माल्य कलश, दिवाबत्ती सोय, वैद्यकीय मदत कक्ष, मंडप व्यवस्था, सुरक्षेच्या उपयायोजना इ.आवश्यक सर्व उपाययोजना महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे. कृत्रिम तलावात विसर्जन केल्यानंतर त्या मूर्ती काढून ठेवण्यासाठी मंडपाची व्यवस्था करण्यात येणार असून त्या मुर्त्या बंद दगडखाणीत नेण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात येणार आहे. यावर्षीही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना परवानगीसाठी 'एक खिडकी योजना' सुरु करण्यात येत असून त्यामधून परवानगी घेवूनच मंडप उभारणी करावी, रस्त्यावर मंडप टाकण्याच्या दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त मंडप टाकू नये, मंडपासाठी रस्ता खोदू नये. त्याचप्रमाणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी श्रींच्या मोठ्या मूर्तींचे विसर्जन न करता प्रतिकात्मक आणलेल्या छोट्या मूर्तींचे विसर्जन करावे तसेच नागरिकांनी 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

मा.उच्च न्यायालय व मा.राज्य शासन यांच्या आदेशानुसार ६ फुटांपर्यंतच्या उंचीच्या सर्व मूर्तींचे विसर्जन हे कृत्रिम तलावात करण्यात येईल, तसेच ६ फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्तींचे विसर्जन जेट्टींच्या ठिकाणी किंवा बंद दगड खाणींच्या ठिकाणी अथवा नैसर्गिक जलस्त्रोतांत करण्यात येईल. अशी माहिती उप-आयुक्त श्रीम.हर्षला राणे यांनी दिली.

बैठकीत पुनरावर्तन संस्थेच्या श्रीम.मनिषा शेठ यांनी त्यांच्या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या पुनरावर्तन उपक्रमाबाबत यावेळी माहिती दिली. पुनरावर्तन उपक्रमाअंतर्गत नागरिकांनी शाडूच्या मातीची मूर्ती आणावी व घरीच मूर्तीचे विसर्जन करावे. तसेच मूर्ती विसर्जनानंतर खाली राहिलेली माती सुकल्यानंतर ती पुन्हा मूर्तीकारांना द्यावी. यामुळे पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यात मदत होणार होईल व हा उपक्रम ज्यांना राबवायचा आहे त्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचे आवाहन श्रीम.मनिषा शेठ यांनी केली.

बैठकीत उपस्थितांमार्फत भुलेश्वर येथील दुर्घटनेत मृत पावलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर मा.महापौर महोदयांनी आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आगमनापूर्वीच रस्त्यावरील खड्ड्यांची डागडूजीचे काम पूर्ण करण्यात येईल तसेच विसर्जनाच्या ठिकाणी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील यामध्ये जेटीच्या मार्गावरील विद्युत व्यवस्था योग्य ठेवणे, तेथे ट्राफिक होऊ नये म्हणून वेगळी वाहन व्यवस्था करणे इ. निर्देश संबंधित विभागाला देण्यात आल्याचे महोदयांनी सांगितले. मा.महापौर महोदयांच्या सुचनेनुसार बैठकीस उपस्थित गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, मूर्तिकार तसेच सन्माननीय नगरसेवक व उपस्थितांना त्यांच्या सूचना, तक्रारी सादर करणेस सांगण्यात आले. यावेळी उपस्थितांकडून गणेशाच्या आगमनापूर्वी रस्त्याची डागडूजी करून घेणे, विसर्जनाच्या मार्गावरील विद्युत व्यवस्था सुस्थितीत ठेवणे, विसर्जन योग्यरित्या व जलदगतीने होण्यासाठी योग्य नियोजन करणे, जेट्टी व दगड खाणीच्या ठिकाणी क्रेन ची व्यवस्था करणे, नागरिकांना विसर्जनाचे नियम तसेच विसर्जनाची ठिकाणे माहिती पडण्यासाठी जागोजागी फलक लावणे, तात्पुरत्या स्वरूपात घेतलेल्या वीज जोडणी बाबत जमा केलेली सुरक्षित अनामत योग्य वेळी परत मिळणे, रस्त्याच्या कडेवर असलेली वाहने हटविणे, वृक्ष छाटणी, काही आवश्यक ठिकाणी जादा पोलीस कर्मचारी ठेवणे इ. विविध सूचना सभेत मांडण्यात आल्या.

पोलीस प्रशासनामार्फत मा.पोलीस उप-आयुक्त श्री.अशोक वीरकर गणेशोत्सव काळात प्रत्येक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना वेळोवेळी भेट देण्याचे नियोजन करण्यात आले असून मंडळांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करणेत आले. विभागामार्फत मिरवणुकीच्या वेळी ट्रॅफिकचे नियोजन योग्यरित्या होण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. योग्य त्या परवानगी घेवूनच मंडप उभारणी करावी, त्याचप्रमाणे वर्गणीच्या नावाखाली काही अनुचित प्रकार होणार नाही याचीही दक्षता घेण्यात यावी. तसेच ध्वनीप्रदूषण होऊ नये याद्दष्टीने डी जे चा वापर करू नये त्याऐवजी पारंपारिक वाद्यांचा वापर मिरवणुकीच्या वेळी करावा. मिरवणुकीत काढतेवेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी मंडळांनी घ्यावी. देखावे किंवा बॅनरमुळे धार्मिक भावना दुखावणार नाही याची दक्षता मंडळांनी घ्यावी व देखावे, मजकूर तपासूनच व परवानगी घेवूनच लावावे. विसर्जन मिरवणुक वेळेत विसर्जनस्थळी पोहोचण्याबाबत दक्षता घ्यावी, तसेच सोशल मिडीयावर एखादी आक्षेपार्ह व्हिडीओ, पोस्ट प्राप्त झाल्यास त्याची सूचना प्रथम पोलीस प्रशासनाला द्यावी, कोणीही कायदा हातात घेऊ नये अशा सूचना यावेळी करण्यात आली.

महावितरण विभागामार्फत श्री.लेले यांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना विविध सूचना यावेळी देण्यात आल्या. यामध्ये मंडपाच्या उंचीच्या मर्यादेचे पालन करणे, मिरवणूक काढताना वापरण्यात येणाऱ्या झेंड्याना लाकडी काठ्या असतील याची दक्षता घ्यावी, मंडपातील विद्युत वाहिन्या उघड्यावर राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी तसेच विद्युत जोडणीला RCCB/ELCB लावण्यात यावे इ.सूचना देण्यात आल्या. महावितरणाकडून मंडपामध्ये विद्युत जोडणी घेतेवेळी मंडळांनी कागदपत्रांसोबत ज्या नावावर विद्युत जोडणी घ्यायची आहे त्याचे बँक खाते क्रमांक/ Cancel Cheque व मोबाईल क्रमांक द्यावा जेणेकरून त्यांनी जमा केलेल्या अनामत रक्कम (Deposit) त्यांना परत करता येईल.

बैठकीत मा.विरोधी पक्षनेते श्री.मनोज पाटील यांनी गणेशोत्सव साजरा करताना मा.न्यायालयाच्या व शासनाच्या नियमांचे पालन करण्याबरोबरच पर्यावरण पूरक व सुरक्षित गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. व यासाठी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) महोदयांनी उपस्थितांना संबोधताना सांगितले कि, महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव संदर्भात आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणेबाबत यापूर्वीच विविध शासकीय विभागांसोबत बैठक घेण्यात आली असून त्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या बैठकीतही उपस्थितांकडून प्राप्त झालेल्या सूचनांची नोंद घेण्यात आली असून त्याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. श्रींचे आगमन व विसर्जन सुलभरित्या होण्यासाठी पावसामुळे निर्माण झालेले खड्डे बुजविण्याचे काम महानगरपालिकेमार्फत युद्धपातळीवर सुरु आहे. प्राप्त सूचनांनुसार तलावामध्ये कृत्रिम तलाव तयार करणेची सूचना विचाराधीन असेल. रस्त्यावरील फेरीवाल्यांबाबत योग्य ती कार्यवाही सुरु राहील, तसेच या उपक्रमाची जनजागृती मोठ्या प्रमाणात करणे साठी महानगरपालिका विविध माध्यमांतून प्रचार प्रसार करेल. तसेच विसर्जनाच्या ठिकाणी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करेलच, परंतु पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा होण्यासाठी नागरिकांचेही तितकेच सहकार्य आवश्यक राहील. मा.उच्च न्यायालय व मा.राज्य शासन यांच्या

आदेशानुसार ६ फुटांपर्यंतच्या उंचीच्या सर्व मूर्तींचे विसर्जन हे कृत्रिम तलावात करावयात, तसेच ६ फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्तींचे विसर्जन जेट्टींच्या ठिकाणी किंवा बंद दगड खाणींच्या ठिकाणी करण्याचे विनंती व आवाहन मा.आयुक्त महोदयांनी यावेळी केले. या सूचनेचे नागरिकांनी तंतोतंत पालन करावे जेणेकरून विसर्जनाच्या नियोजनामध्ये कोणताही अडथळा निर्माण होणार नाही. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीही रीतसर परवानगी घेऊनच, नियमांचे पालन करूनच मंडप उभारणी करावी. विसर्जनाच्या वेळेचे बंधन पाळावे. जाहिरात फलक लावताना रीतसर परवानगी घ्यावी. तसेच प्रशासनाने दिलेल्या नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मा.आयुक्त महोदयांनी केले.

मा.महापौर श्री.अजीव पाटील महोदयांनीही पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेच्या अनुषंगाने प्रशासनामार्फत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील असे सांगत नागरिकांनी, गणेशोत्सव मंडळांनी कोणतीही अडचण असल्यास प्रशासनाबरोबरच तेथील सन्माननीय नगरसेवकांशी संपर्क साधावा, त्यांचेही सहकार्य आपणांस मिळेल. तसेच गणेशोत्सव काळात आलेले अनुभव नोंदवून ठेवावेत, गणेशोत्सवानंतर त्यावरही एक बैठक आयोजित करण्यात येईल जेणेकरून पुढील गणेशोत्सवात त्याबाबत योग्य ती खबरदारी घेणे शक्य होईल असे मा.महापौर महोदयांनी सुचविले. यानंतर सभेचे सूत्रसंचालक नगरसचिव श्री.विश्वनाथ तळेकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.महापौर महोदयांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

या बैठकीला मा.महापौर श्री.अजीव पाटील, मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.), मा.सभागृह नेते श्री.प्रफुल्ल साने, मा.विरोधी पक्षनेते श्री.मनोज पाटील, मा.नगरसेवक-नगरसेविका, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत, मा.पोलीस उप-आयुक्त श्री.शशिकांत बोराटे, मा.पोलीस उप-आयुक्त श्री.अशोक वीरकर, मा.उप-विभागीय अधिकारी श्री.शेखर घाडगे, तसेच महानगरपालिकेचे माजी नगरसेवक, पोलीस विभाग, महावितरण विभागाचे अधिकारी, विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, मूर्तिकार व महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.